तिवसा पंचायत समिती (जि. अमरावती) नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१३/प्र.क्र.१९६/बांधकाम-४
मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: २३ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) शासन निर्णय, ग्रा.वि.व ज.सं.वि.क्र.पंसई-२०१०/प्र.क्र.१८२/पंरा-७, दि. १८ ऑक्टोबर,२०१०

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अमरावती यांचे पत्र क्र.जिप/बांध/तां-४/८५३/२०१३, दि. ११.०२.२०१३ , पत्र क्र. क्र.जिप/बांध/पसई/तां-४/३१६६/२०१४, दि. २६.५.२०१४, पत्र क्र. क्र. जिप/ बांध/उपवि १/तां/५६३३/१४ दि. २८.०८.२०१४, पत्र क्र. क्र.जिप/बांधकाम/तां/१०२२४/ २०१६, दि. १६.०८.२०१६ व पत्र क्र. क्र.जिप/बांध//तां-३/१७६२/२०१७, दि. १३.०२.२०१७

प्रस्तावना :-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी वरील पत्रान्वये तिवसा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. तिवसा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या रु. २२१.६० लक्ष किंमतीच्या सविस्तर अंदाज पत्रकास दिनांक १८.१०.२०१० च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यता ही सन २००९-१० च्या दरसूचीवर आधारीत होती. त्यानुसार, तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास सन २०१०-११ मध्ये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आल्यानंतर विहीत निविदा प्रक्रीयेचा अवलंब करुन दिनांक ३१.१२.२०११ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात येऊन कामास सुरुवात करण्यात आली ज्यामध्ये फक्त मुख्य इमारतीची बाब अंतर्भुत होती. अमरावती जिल्ह्यातील उष्ण हवामान विचारात घेवून, तिवसा पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीभोवती चारही बाजूने आच्छादीत व्हरांड्याचे बांधकाम करण्यासाठी मुळ प्रशासकीय इमारतीच्या कामामध्ये ३५४.६२ चौ.मी. वाढीव क्षेत्रफळाच्या बाह्य व्हरांड्याचे अतिरीक्त काम करणे दिनांक २६.०२.२०१३ रोजी प्रस्तावित करण्यात आले असून त्यासाठी, मुख्य वास्तुशास्त्रज्ञांनी तयार केलेला आराखडा क्र. एव्हीएम/१४०७, दि. ८.११.२०१२ सादर करण्यात आला आहे. सदर वाढीव इमारत बांधकामासाठी तसेच, इमारतीमध्ये जल पुन:र्भरण योजना, मुख्य इमारत विद्युतीकरण, आग प्रतिबंधक सुविधा, अपंगांसाठी रॅम्प-रेलिंग सुविधा, भुपातळी संधारण, परीसर वृक्ष लागवड व दरसूचीतील संभाव्य वाढ इत्यादी बाबींमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. या सर्व बाबींमुळे तिवसा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या खर्चात एकूण रु. ९२,४७,०००/- इतकी वाढ झालेली आहे. या कामी अमरावती जिल्हा परिषदेला प्रशासकीय मान्यतेएवढा पूर्ण निधी टप्प्या-टप्प्याने वितरीत करण्यात आला असून इमारत बांधकाम प्रशासकीय मान्यता किंमतीच्या टप्प्यावर आल्यामुळे वरील प्रमाणे आवश्यक कामे या निधीमध्ये पुर्ण करता येणे शक्य नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, अमरावती यांनी संदर्भीय पत्रान्वये रु. ३१४.०७ लक्ष इतक्या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अमरावती यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननी अंती तिवसा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता रुपये ३१४.०७ लक्ष इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

४. तिवसा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या मुळ प्रशासकीय मान्यता रुपये २२१.६० लक्ष रक्कमेमध्ये रुपये ९२.४७ लक्ष इतकी वाढ करुन रुपये ३,१४,०७,०००/- (अक्षरी रुपये तीन कोटी चौदा लक्ष सात हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास, या शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५. तिवसा पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या मुळ प्रशासकीय व सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकाचा तुलनात्मक गोषवारा खालील प्रमाणे आहे:-

पंचायत समिती तिवसा नवीन प्रशासकीय इमारतीच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा तुलनात्मक गोषवारा

अ. क्र.	बाबीचा तपशिल	मुळ प्रशासकीय मान्यतेनुसार रक्कम (रु.)	सुधारीत प्रशासकीय मान्यता रक्कम (रु.)	बचत रक्कम (रु.)	अतिरिक्त रक्कम (रु.)
१	२	३	४	५	६
१	मुख्य स्थापत्य काम	१७१७७५९२.००	२३३९७०००.००	०.००	६२१९४०८.००
२	अंतर्गत रस्ते	१०१०६०९.००	१००००००.००	१०६०९.००	०.००
३	आकस्मिक खर्च	६८७१०४.००	६८७०००.००	१०४०००.००	०.००
४	विद्युतीकरण	१८८९५३५.००	२३८९०००.००	०.००	४९९४६५.००
५	पाणी पुरवठा व मल:निस्सारण	१३७४२०७.००	१९७४०००.००	०.००	५९९७९३.००
६	संगणकीकरण	२०२१२.००	२००००.००	२१२.००	०.००
७	रुफ वॉटर हार्वेस्टींग	२०००००.००	२०००००.००	०.००	२०००००.००
८	अग्नीशमन यंत्रणा	२०००००.००	२०००००.००	०.००	२०००००.००
९	परीसर वृक्ष लागवड	५०००००.००	५०००००.००	०.००	५०००००.००
१०	भुपातळी संधारण	२०००००.००	२०००००.००	०.००	२०००००.००
११	दरसूचीतील संभाव्य वाढ	८४००००.००	८४००००.००	०.००	८४००००.००
	एकूण	२२१५९२५९.००	३१४०७०००.००	१०९२५.००	९२५८६६६.००
	अतिरिक्त(६-५)			४१.७२%	९२४७७४१.००
	एकूण	२२१६००००.००	३१४०७०००.००		९२४७०००.००

६. उपरोक्त प्रशासकीय इमारत बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सहायक अनुदान स्वरुपात टप्प्या-टप्प्याने, उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे निधी वितरीत करण्यात येईल. या कामी वितरीत करण्यात आलेला रु. २२१.५९ लक्ष निधी वजा जाता उर्वरीत रु. ९२.४७ लक्ष इतका निधी जिल्हा परिषदेला देय राहील.

७. तिवसा पंचायत समितीच्या कामाच्या किंमतीत पुनःश्च कोणतीही भाववाढ यापुढे देय होणार नाही. सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत सदर इमारतीचे बांधकाम मार्च-२०१८ अखेरपर्यंत नियोजनबध्दरित्या पूर्ण करुन व लेखे अंतिम करुन इमारत विनाविलंब वापरात आणण्यात यावी.

८. तिवसा पंचायत समिती प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्रगतीची माहिती शासनाने विकसीत केलेल्या कंस्ट्रक्शन ट्रॅकर प्रणालीवर तात्काळ अद्यावत करण्यात यावी.

९. या कामावरील खर्च हा "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३)" या लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीमधून खर्ची टाकण्यात यावा.

१०. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग- ५, अ.क्र.९ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका प्रकरण क्र.३ नुसार परि.क्र.१३४ (क) खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारास अनुसरुन तसेच, सा.बां.वि. अनौ.सं.क्र.३००/१७/इमा-३, दिनांक १२.०७.२०१७, वि.वि. अनौ.सं.क्र. ४२२/२०१७/व्यय-१५, दिनांक २०.१०.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यांत येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७११२३१५१७३१०२२० हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2017.11.23 16:00:34 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. विरोधी पक्ष नेता विधानसभा/ विधानपरिषद
२) विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर
३)महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४)मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
५)अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
६)मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती
७)कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद अमरावती

८)जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा अमरावती
९)मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१०)उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा औरंगाबाद विभाग, अमरावती
११)जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, अमरावती
१२)सभापती, पंचायत समिती, तिवसा, जिल्हा अमरावती
१३)गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तिवसा, जिल्हा अमरावती
१४)वित्त विभाग - (व्यय-१५, अर्थ सं. -२) , मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१५) नियोजन विभाग (का-१४४४) , मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१६) सार्वजनिक बांधकाम विभाग इमारती-३ , मंत्रालय मुंबई ४०० ०३२
१७) निवड नस्ती कार्यासन बांधकाम-४, ग्रा.वि.व ज.सं.विभाग, बांधकाम भवन मुंबई